दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

अहिल्यानगरमध्ये गावठी दारुच्या भट्ट्यांवर छापे!

अहिल्यानगर (प्रतिनिधी) : राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने नगर तालुक्यातील खंडाळा आणि नेप्ती परिसरात अवैधरीत्या सुरू असलेल्या गावठी हातभट्टी दारूच्या अड्ड्यांवर धडक कारवाई केली आहे. या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात गावठी दारू आणि दारूनिर्मितीसाठी वापरण्यात येणारे कच्चे साहित्य जप्त करून घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अवैध कत्तलखान्यावर कारवाई, 1400 किलो गोमांस जप्त, गुन्हा दाखल

संगमनेर: येथील अवैध कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई करुन छाप्यात 1400 किलो गोमांस जप्त करण्यात आले. मुम्मका सुदर्शन, (पोलीस अधीक्षक)यांनी स्थानिक गुन्हे शाखेस जिल्ह्यामधील अवैध व्यावसायिकांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिले होते..त्यानुषंगाने पोनि. संतोष मुटकुळे, स्थानिक गुन्हे शाखा यांनी पोउपनि.कृष्णकुमार सेदवाड व पोलीस अंमलदार अतुल लोटके, गणेश लबडे, प्रकाश मांडगे, अमोल आजबे व संभाजी कोतकर, अशांचे पथक तयार करून अवैध धंदयाची माहिती काढुन कारवाई करणेबाबत सुचना देऊन पथकास रवाना केले.

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २०४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

रवि रामू कलोसेजी 18 नोव्हेंबर रोजी परभणी दौऱ्यावर

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी,: राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवि रामू कलोसेजी हे बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे. दि. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता परभणी महानगरपालिका येथील सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली आहे. यावेळी सफाई कर्मचाऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या समस्या आणि विविध प्रलंबित बाबींवर चर्चा करण्यात येणार आहे. दुपारी १.०० वाजता परभणी येथील बी. रघुनाथ सभागृहात पत्रकार परिषद होणार आहे. सायंकाळी ४.०० वाजता ते रस्तेमार्गे परभणी येथून लातूरकडे प्रयाण करणार असून रात्री ७ वाजता लातूरकडे रवाना होणार आहेत.

रत्नाफिनने नवीन शाखा सुरु

छत्रपती संभाजीनगर, ऑक्टोबर २०२६ – एमएसएमई क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणारी आघाडीची एनबीएफसी, 'रत्नाफिन'ने आज छत्रपती संभाजीनगरमध्ये आपल्या नवीन शाखेची सुरुवात केली आहे. या विस्तारामुळे महाराष्ट्रात कंपनीची उपस्थिती अधिक दृढ झाली असून, या भागातील उद्योजक, व्यावसायिक आणि उदयोन्मुख उद्योगांच्या विकासाच्या आकांक्षांना पाठिंबा देण्याची कंपनीची वचनबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. आतापर्यंत १२,००० कोटी रुपयांहून अधिक कर्जवाटप केलेल्या आणि संपूर्ण भारतात विस्तारत असलेल्या रत्नाफिनने, ग्राहकांच्या बदलत्या गरजांनुसार स्थानिक आर्थिक उपाययोजनांद्वारे उच्च क्षमता असलेल्या बाजारपेठांमध्ये आपली पोहोच वाढवण्याचे काम सुरू ठेवले आहे.

कंटेंट क्रिएटर्सना कमाईच्या नव्या संधी

बेंगळुरू: मीशोने यूट्यूब शॉपिंगसोबत भागीदारीची घोषणा केली आहे. देशभरातील कंटेंट क्रिएटर्सना कमाईच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे हा या भागीदारीचा उद्देश आहे. या भागीदारीअंतर्गत पात्र यूट्यूब क्रिएटर्स त्यांच्या व्हिडिओ, शॉर्ट्स आणि लाइव्ह स्ट्रीममध्ये थेट मीशोची उत्पादने टॅग करू शकतील. यूट्यूबच्या निश्चित अटी पूर्ण करणारे आणि किमान 500 सबस्क्राइबर्स असलेले क्रिएटर्सदेखील या कार्यक्रमात सहभागी होऊ शकतील.

'युवा स्मार्ट टर्म' या नवीन जीवन विमा योजनेचा शुभारंभ

नाशिक : स्टार युनियन दाई-इची लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एसयूडी लाइफ) ने 'एसयूडी लाइफ युवा स्मार्ट टर्म' या शुद्ध मुदतीच्या जीवन विमा योजनेचा शुभारंभ जाहीर केला आहे. विवाह, अपत्यांचा जन्म, गृहकर्ज किंवा मुलांच्या शिक्षणासाठी घेतलेले कर्ज यांमुळे कुटुंबाच्या आर्थिक गरजा वाढतात.

टोयोटा ड्रीम कार आर्ट कॉन्टेस्टच्या आवृत्तीची घोषणा

बेंगळुरू: टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) कडून 'टोयोटा ड्रीम कार आर्ट कॉन्टेस्ट' (टीडीसीएसी) च्या 20 व्या आवृत्तीची घोषणा करण्यात आली आहे. टोयोटा मोटर कॉर्पोरेशन, जपान यांच्याकडून सुरू करण्यात आलेला हा एक महत्त्वाचा जागतिक उपक्रम असून, मुलांमधील कल्पकता आणि क्रिएटिव्हिटीला प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. भारतातील 15 वर्षे आणि त्यापेक्षा कमी वयाची मुले या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. 15 नोव्हेंबर 2026 पासून सुरू झालेल्या या स्पर्धेसाठी 15 जानेवारी 2027 पर्यंत प्रवेशिका पाठवता येणार आहेत.

ताशी 145 किमी वेगाने धडकणार 'अकवान' चक्रीवादळ

आंध्र प्रदेश, ओडिसामध्ये हाय अलर्ट, शाळांना सुट्ट्या जाहीर तर महाराष्ट्रातही पावसाची शक्यता

मुंबई : बंगालच्या उपसागरात निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा आता एका तीव्र चक्रीवादळात बदलत असून, या भीषण " (Akvan) चक्रीवादळाचा धोका निर्माण झाला आहे. १७ ते १८ नोव्हेंबर दरम्यान हे वादळ अधिक तीव्र होणार असून, १९ नोव्हेंबरला ते अत्यंत घातक रूप धारण करेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने (IMD) वर्तवला आहे. हे वादळ ताशी १३० ते १४५ किलोमीटर प्रति तास या वेगाने आंध्र प्रदेशच्या समुद्रकिनाऱ्याला धडकण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पूर्व किनारपट्टीवरील राज्यांमध्ये प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे सतर्क झाली असून युद्धापातळीवर तयारी सुरू करण्यात आली आहे.

ओडिसा आणि आंध्र प्रदेशात हाय अलर्ट आणि कडक उपाययोजना

या चक्रीवादळाचा सर्वाधिक धोका ओडिसा आणि आंध्र प्रदेश राज्यांना असून, तेथील प्रशासनाने आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी



कंबर कसली आहे. ओडिसा सरकारने या संकटाचा सामना करण्यासाठी तब्बल ६० विशेष पथके (टिम्स) तैनात केली आहेत, तर एनडीआरएफच्या (NDRF) १४ तुकड्या आधीच सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. रायगडा, गंजाम, गजपती, कोरापुट, पुरी आणि मलकानगिरी या जिल्ह्यांमध्ये विशेष प्रशासकीय यंत्रणा अलर्ट मोडवर आहे. १८ ते २१ नोव्हेंबर दरम्यान या भागात अतिमुसळधार पाऊस पडण्याचा इशारा देण्यात आला आहे. संभाव्य धोका लक्षात घेता काही भागांमधील शाळांना सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत, तसेच सुरक्षेचा उपाय म्हणून गर्भवती महिलांना तातडीने सुरक्षित स्थळी हलवण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. तसेच सरकारी कर्मचाऱ्यांच्या सर्व सुट्ट्या रद्द करून आपत्कालीन सेवा सुरू ठेवण्यात आल्या आहेत.

या महाभयंकर चक्रीवादळाच्या प्रभावामुळे दूरवर असलेल्या परिसरातील वातावरणातही बदल झाला असून, अनेक भागांमधून थंडी अचानक गायब झाली आहे. याआधी २०१३ मध्ये अशाच प्रकारची दुर्मिळ परिस्थिती पाहायला मिळाली होती, जेव्हा अवघ्या २५ दिवसांत बंगालच्या उपसागरात 'हेलेन', 'लहर' आणि 'माडी' अशी तब्बल तीन चक्रीवादळे निर्माण झाली होती. यंदाही अगदी तशीच पुनरावृत्ती होत असून एकामागून एक तीन चक्रीवादळे तयार झाली आहेत. दरम्यान, या चक्रीवादळाचा थेट धोका महाराष्ट्राला नसला, तरी या हवामानाच्या बदलामुळे राज्यातील काही भागांत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

नाशिक जिल्ह्यात बालविवाहांचे 111 प्रकार उघड, गुन्हे दाखल

नाशिक : बालविवाह रोखण्यासाठी शासन आणि विविध सामाजिक संस्थांकडून जनजागृती केली जात असतानाही नाशिक जिल्ह्यात बालविवाहाच्या घटना थांबण्याचे नाव घेत नाहीत. जिल्ह्यात आतापर्यंत बालविवाहासंदर्भात तब्बल १११ तक्रारी प्राप्त झाल्याची माहिती समोर आली आहे. प्रशासनाच्या हस्तक्षेपामुळे ८० कुटुंबांनी बालविवाहाचा निर्णय मागे घेत विवाह पुढे ढकलण्यास संमती दिली आहे. तर तीन गंभीर प्रकरणांमध्ये संबंधितांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जिल्ह्यात बालविवाहाच्या सर्वाधिक २३ तक्रारी मालेगाव येथून प्राप्त झाल्या आहेत. त्याखालोखाल नाशिक तालुक्यात १६, तर सिन्नर तालुक्यात १५ तक्रारी दाखल झाल्या आहेत. दुसरीकडे पेठ, कळवण आणि नांदगाव तालुक्यांत बालविवाहासंदर्भातील एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. प्राप्त तक्रारींपैकी १३ तक्रारी खोट्या असल्याचे तपासात निष्पन्न झाले. काही प्रकरणांमध्ये अपुरी माहिती देण्यात आली होती, तर काही ठिकाणी संबंधित मुलगा आणि मुलगी विवाहासाठी कायदेशीर वयाचे असल्याचे स्पष्ट झाले. बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास विभाग, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड लाइन आणि पोलीस प्रशासन संयुक्तपणे काम करत आहेत.

बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे नेणार

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला शिवसेना सरसावली

मुंबई: हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या १४व्या पुण्यतिथीनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना विनम्र अभिवादन केले. दरवर्षीप्रमाणे बाळासाहेबांचे निष्ठावंत शिवसैनिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते आज येथे येऊन आपल्या लाडक्या नेत्याला अभिवादन करतात, असे त्यांनी यावेळी सांगितले. स्वर्गीय बाळासाहेबांचे हिंदुत्वाचे विचार आणि ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हा मूलमंत्र शिवसेना आजही तितक्याच ताकदीने पुढे नेत आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे केले. बाळासाहेबांच्या विचारांचे सरकार महाराष्ट्रात चांगले काम करत असून, समाजकारणाला प्राधान्य देत सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले जात आहेत. बाळासाहेबांची शिकवण नेहमीच ही होती की, कार्यकर्ता घरात नाही तर दारात शोभून दिसतो. याच विचारानुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीत शिवसैनिक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी, दुःख आणि वेदना समजून घेत आहेत. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना शक्य ती सर्व मदत करण्याचे काम सुरू आहे, असे शिंदे यांनी सांगितले. पुढे बोलताना, 'जिथे संकट, तिथे शिवसेना आणि जिथे आपत्ती, तिथे शिवसेना' ही बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण आम्ही प्रत्यक्ष कृतीतून पुढे नेत आहोत.

राफेल इंजिनसाठी भारताची तयारी! फ्रान्सच्या मदतीने देशातच उभारणार M88 इकोसिस्टम

मुंबई : भारत आणि फ्रान्स यांच्यातील संरक्षण सहकार्याला नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे. राफेल लढाऊ विमानांना शक्ती देणाऱ्या M88 इंजिनच्या निर्मिती आणि देखभालीसाठी भारतातच मजबूत इकोसिस्टम उभारण्याच्या हालचाली सुरू आहेत. फ्रान्सची प्रसिद्ध एरोस्पेस कंपनी सफ्रान (Safran) यासाठी भारताला सहकार्य करणार आहे. त्यामुळे भविष्यात भारताची परदेशी कंपन्यांवरील अवलंबित्व कमी करण्याच्या प्रयत्नांना चालना मिळू शकते.

काय आहे M88 इंजिनची योजना?

M88 हे फ्रान्सच्या राफेल लढाऊ विमानात वापरले जाणारे इंजिन आहे. सध्या या इंजिनची निर्मिती फ्रान्समध्ये केली जाते. मात्र, भारतात राफेल विमानांची संख्या वाढण्याची शक्यता लक्षात घेता इंजिनची देखभाल, दुरुस्ती आणि उत्पादनाशी संबंधित सुविधा भारतात विकसित करण्यावर भर दिला जात आहे. फ्रेंच कंपनी सफ्रानचे मुख्य कार्यकारी अधिकारी ऑलिव्हियर अँड्रिएस यांनी फेब्रुवारी 2026 मध्ये भारताच्या गरजेनुसार M88 इंजिनची असेंब्ली लाइन भारतात सुरू करण्याची तयारी दर्शवली होती. मात्र, यासाठी भारतीय हवाई दलाकडून मोठ्या प्रमाणात अतिरिक्त राफेल विमानांची ऑर्डर मिळणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी



स्पष्ट केले होते.(Make In India)

हैदराबादमध्ये उभारली जाणार महत्त्वाची सुविधा

भारतासाठी या क्षेत्रातील महत्त्वाची घडामोड म्हणजे हैदराबादमध्ये M88 इंजिनच्या देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉलसाठी (MRO) सुविधा उभारण्याची योजना. नोव्हेंबर 2025 मध्ये या प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली होती. या प्रकल्पासाठी 40 दशलक्ष युरोपेक्षा अधिक गुंतवणूक प्रस्तावित आहे. सुमारे 5 हजार चौरस मीटर क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या या केंद्रातून दरवर्षी 600 हून अधिक इंजिन मॉड्यूल्सची देखभाल आणि दुरुस्ती करण्याची क्षमता असेल. पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर या केंद्रातून सुमारे 150 रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.(Atmanirbhar Bharat)

भारतीय कंपन्यांनाही मिळणार संधी

या सहकार्याचा फायदा केवळ इंजिनच्या देखभालीपुरता मर्यादित राहणार नाही. भारतातील स्थानिक कंपन्यांना विमान उद्योगासाठी आवश्यक सुटे भाग आणि इतर घटक पुरवण्याची संधी मिळू शकते. सफ्रानने भारतातील पुरवठादारांकडून खरेदी वाढवण्याची योजनाही मांडली आहे. ऑक्टोबर 2026 मध्ये सफ्रानने बंगळुरूमध्ये आयोजित केलेल्या पुरवठादार परिषदेत 115 हून अधिक भारतीय पुरवठादार सहभागी झाले होते. भारतात अधिक मजबूत आणि सक्षम एरोस्पेस इकोसिस्टम उभारण्यावर या परिषदेत भर देण्यात आला.

भारत-फ्रान्स सहकार्याला नवी दिशा

भारत आणि फ्रान्स यांच्यातील संरक्षण क्षेत्रातील संबंध सातत्याने मजबूत होत आहेत. राफेल विमानांसह हेलिकॉप्टर इंजिन, विमानांचे सुटे भाग आणि इतर अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांतही दोन्ही देश सहकार्य करत आहेत. भारतामध्ये M88 इंजिनच्या देखभालीपासून भविष्यातील असेंब्ली आणि स्थानिक पुरवठा साखळीपर्यंत सुविधा विकसित झाल्यास देशाच्या विमान उद्योगाला फायदा होऊ शकतो. मात्र, भारतात संपूर्ण इंजिन निर्मिती सुरू झाल्याची अधिकृत घोषणा झालेली

'अयोध्या झाली, आता मथुरेची बारी'; 2027 च्या यूपी निवडणुकांसाठी भाजपचे श्रीकृष्णाच्या नगरीत महामंथन, बैठकीनंतर योगी दिल्लीला रवाना होणार

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशात २०२७ मध्ये होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाने (भाजप) आतापासूनच कंबर कसली आहे. राज्यात पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी भगवान श्रीकृष्णाच्या मथुरा नगरीत भाजपचे एक मोठे आणि महत्त्वाचे चिंतन शिबिर भरवण्यात आले आहे. या बैठकीत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ (Yogi Adityanath) यांच्यासह पक्षाचे ४५ प्रमुख नेते सहभागी झाले आहेत. यामध्ये दोन्ही उपमुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष पंकज चौधरी, संघटन महामंत्री बी. एल. संतोष, निवडणूक प्रभारी विनोद तावडे आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नवीन यांचा समावेश आहे. मथुरेतील हे दोन दिवसीय मंथन संपल्यानंतर मुख्यमंत्री योगी आज सायंकाळी तातडीने दिल्लीला जाणार असून, तिथे ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन पुढील रणनीतीवर चर्चा करणार आहेत.

दिल्लीत केंद्रीय नेतृत्वाशी महत्त्वाची खलबते

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मथुरेतील बैठक आटोपताच मुख्यमंत्री योगी दिल्लीच्या दिशेने रवाना होतील. दिल्लीत पोहोचल्यावर ते गृहमंत्री अमित शाह आणि राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नवीन यांच्यासोबत निवडणुकीच्या तयारीबाबत सविस्तर चर्चा करतील. मथुरेत कालपासून २०२७ च्या निवडणुकीचे सूक्ष्म नियोजन सुरू आहे. या बैठकीत मित्रपक्षांसोबतचे जागावाटप, उमेदवारांची निवड, सोशल मीडियाद्वारे विरोधकांचा सामना करणे आणि विरोधकांच्या 'पीडीए' (PDA - पिछडा, दलित, अल्पसंख्याक) प्रचाराला चोख उत्तर देणे या विषयांवर सखोल मंथन होत आहे. यासोबतच, मतदार यादीतून (SIR) वगळल्या गेलेल्या नावांचा गंभीर विषयही या बैठकीत चर्चिला जात आहे.

सत्तेत पुनरागमन आणि विरोधकांच्या डावपेचांना शह

मथुरेतील या बैठकीच्या पहिल्या दिवशी सत्तेत पुन्हा येण्यासाठी आवश्यक असलेली राजकीय, सामाजिक आणि संघटनात्मक समीकरणे कशी जुळवायची, यावर विशेष भर देण्यात आला. या निवडणुकीत समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्या 'पीडीए' राजकारणाला कसा शह द्यायचा, हे भाजपसमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे. अखिलेश यादव यांचा चुनावी अजेंडा पूर्णपणे मोडून काढणे, हेच भाजपच्या सध्याच्या रणनीतीचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे दिसून येत आहे.

मथुरा मंथनातील भाजपचे प्रमुख संकल्प

पक्षाची पारंपारिक व्होटबँक अबाधित आणि एकजूट ठेवणे.

मागासवर्गीय आणि दलित समाजाला पक्षाशी अधिक घट्टपणे जोडून ठेवणे.

गाव आणि वॉर्ड पातळीवरील म्हणजेच बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांना पुन्हा सक्रिय करणे.

मतदारांशी थेट संपर्क साधणारी 'पन्ना प्रमुख' यंत्रणा पूर्ण क्षमतेने कामाला लावणे.

सरकारी योजनांचा लाभ थेट शेवटच्या गरजू नागरिकांपर्यंत पोहोचवणे.

सरकार आणि पक्ष संघटना या दोघांमध्ये उत्तम समन्वय व ताळमेळ राखणे.

"अयोध्या झाली, आता मथुरेची

शासकीय वसतिगृह प्रवेश व स्वाधार योजनेच्या ऑनलाईन अर्जास 30 नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परमणी: समाज कल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेश व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२६-२७ अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना महाआयटी पोर्टलवर नवीन व नूतनीकरण ऑनलाईन अर्ज करण्यास दिनांक ३० नोव्हेबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, परभणी यांनी दिली आहे.

वसतिगृह प्रवेशासाठी स्पॉट ऍडमिशन नोंदणी दिनांक २८ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ६.०० वाजेपर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय किंवा संबंधित शासकीय वसतिगृहात प्रत्यक्ष येऊन करावयाची आहे. नोदणीनंतर पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ रात्री १२.०० वाजेपर्यंत आहे. तसेच वसतिगृह व स्वाधार योजनेचे सेंट बॅक/अंडर स्क्रुटनीमधील अर्ज त्रुटी पूर्ण करून दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत फेरसादर करावेत.

सदर सुविधा वैद्यकीय, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सुरू आहे. नोंदणीसाठी येताना सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात. नोंदणी न केलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज भरता येणार नाही. अर्ज करण्यासाठी अधिकृत पोर्टल hmasnew.mahait.org हे आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांनी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता विहित मुदतीत अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अनिल अंजनीकर, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय यांनी केले आहे.

किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीचे शोरूम

लातूर : देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांचा ब्रँड, किसनाडायमंड अँड गोल्ड ज्वेलरीने, महाराष्ट्रातील लातूर येथे आपल्या नवीन एक्सक्लुझिव्ह ब्रँड शोरूमचे भव्य उद्घाटन साजरे केले. हे किसनाचे महाराष्ट्रातील १४ वे एक्सक्लुझिव्ह शोरूम आहे. हरि कृष्णा ग्रुपचे संस्थापक आणि किन्स्नाचे संस्थापक श्री. घनश्यामभाई ढोलकिया यांच्या हस्ते इतर मान्यवरांच्या उपस्थितीत या शोरूमचे उद्घाटन करण्यात आले. या विस्ताराचा उद्देश लातूर आणि आसपासच्या परिसरातील ग्राहकांना उत्कृष्ट गुणवत्ता, आधुनिक डिझाइन्स आणि एक उत्तम खरेदीचा अनुभव प्रदान करणे आहे. या प्रसंगी बोलताना, हरी कृष्णा ग्रुपचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. घनश्यामभाई ढोलकिया म्हणाले, "देशभरातील प्रत्येक भारतीय घरापर्यंत सुंदर आणि दर्जेदार हिऱ्यांचे आणि सोन्याचे दागिने पोहोचवणे, हे 'किसना'चे ध्येय आहे. महाराष्ट्र आमच्यासाठी एक महत्त्वाची बाजारपेठ आहे आणि लातूरमधील या नवीन शोरूमचे उद्घाटन हे त्या दिशेने टाकलेले आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे.



महाराष्ट्रातील मतदारांसाठी 22 डिसेंबरला अंतिम मतदार यादी; निवडणूक आयोगाने जाहीर केले नवे वेळापत्रक

मुंबई : महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेसंदर्भात (SIR-2026) भारतीय निवडणूक आयोगाने महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. 17 नोव्हेंबर 2026 रोजी जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार महाराष्ट्रासह 7 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील SIR प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या निर्णयानुसार महाराष्ट्रातील अंतिम मतदार यादी 22 डिसेंबर 2026 रोजी प्रसिद्ध होणार आहे. निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात ASDD मतदारांच्या गणना अर्जांसंदर्भातही महत्त्वाचे वेळापत्रक दिले आहे. त्यानुसार 18 नोव्हेंबर 2026 पर्यंत गणना अर्जांची निर्मिती आणि छपाई पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतर 18 ते 30 नोव्हेंबर 2026 या कालावधीत अर्जांचे वितरण आणि संकलन केले जाणार आहे. तर 10 डिसेंबर 2026 पर्यंत गणना अर्जांचा निपटारा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्रासाठी SIR प्रक्रियेचे नवे वेळापत्रक

निवडणूक आयोगाच्या सुधारित वेळापत्रकानुसार महाराष्ट्रात दावे आणि हरकतींच्या प्रक्रियेसाठी 31 ऑगस्ट 2026 ते 15 डिसेंबर 2026 हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानंतर 22 डिसेंबर 2026 रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. या प्रक्रियेत महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, दिल्ली, नागालँड, तेलंगणा, हरियाणा आणि झारखंड या राज्यांचा व केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. या सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख 22 डिसेंबर 2026 निश्चित करण्यात आली आहे.

राजकीय पक्षांनाही कळवणार सुधारित वेळापत्रक

निवडणूक आयोगाने संबंधित राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना आणि प्रशासकीय यंत्रणांना या निर्णयाची माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच ASDD मतदारांच्या गणना प्रक्रियेची आणि SIR-2026 च्या सुधारित वेळापत्रकाची सर्व उपलब्ध माध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्धी करण्यास सांगितले आहे. राजकीय पक्षांनाही या बदललेल्या वेळापत्रकाची लेखी स्वरूपात माहिती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मतदार यादीच्या पुनरीक्षण प्रक्रियेला आता वेग येणार असून, 22 डिसेंबरला प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

होर्मुझची सामुद्रधुनी आणि 'तारा गॅस'वरील क्षेपणास्त्र हल्ला

जागतिक व्यापाराच्या आणि विशेषतः इंधन पुरवठ्याच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील मानल्या जाणाऱ्या होर्मुझच्या सामुद्रधुनीत (Strait of Hormuz) सुरू असलेल्या हल्ल्यांच्या सत्राने आता आंतरराष्ट्रीय व्यापाराला पुन्हा एकदा हादरवून सोडले आहे. १६ नोव्हेंबर रोजी या सामरिक मार्गावर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्याचे लक्ष्य ठरलेल्या जहाजाची ओळख भारताने पटवली असून, पनामा देशाचा ध्वज असलेले आणि द्रवरूप पेट्रोलियम वायू (LPG) वाहून नेणारे 'तारा गॅस' हे टँकर या हल्ल्याचे लक्ष्य ठरले होते. केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी याबाबत अधिकृत माहिती देताना जहाजावरील सर्व २५ कर्मचारी पूर्णपणे सुरक्षित असल्याची मोठी आणि दिलासादायक बातमी दिली आहे. सुदैवाने या हल्ल्यात जीवितहानी टळली असली, तरी या घटनेने सागरी सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. युनायटेड किंगडम मेरीटाइम ट्रेड ऑपरेशन्स (UKMTO) च्या अहवालानुसार, १६ नोव्हेंबर रोजी रात्री ओमानमधील खासाब शहराच्या उत्तरेला ७ नॉटिकल मैल अंतरावर एका जहाजावर हा हल्ला झाला होता. सुरुवातीला अज्ञात वस्तूची धडक बसल्याचे सांगितले गेले असले, तरी या हल्ल्यामुळे टँकरचे नुकसान झाले आणि त्याच्या इंजिन कक्षात आग लागली होती. अशा धोरणात्मक सागरी मार्गांवर सातत्याने होणारे हल्ले जागतिक ऊर्जा पुरवठ्यासाठी अत्यंत घातक आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर UKMTO ने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्व व्यावसायिक जहाजांना अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे निर्देश दिले आहेत. विशेष म्हणजे, १७ नोव्हेंबर रोजीच ओमान आणि इराण यांच्यात सागरी सुरक्षेबाबत उच्चस्तरीय चर्चा झाली असताना ही घटना घडल्यामुळे मध्यपूर्वेतील तणाव अधिकच गडद झाला आहे. भारत हा आपल्या ऊर्जेच्या गरजांसाठी मोठ्या प्रमाणावर मध्यपूर्वेतील देशांवर अवलंबून आहे. अशा वेळी भारतीय खलाशांची सुरक्षितता आणि व्यापारी जहाजांचे रक्षण करणे ही देशापुढील एक मोठी प्राथमिकता आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर या सागरी मार्गांची सुरक्षा अबाधित राखण्यासाठी सर्व प्रमुख देशांनी एकत्रित येऊन ठोस पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे. केवळ तात्पुरते धोक्याचे इशारे देऊन चालणार नाही, तर या अशांत सागरी पट्ट्यात कायमस्वरूपी शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी कडक राजनैतिक आणि सुरक्षात्मक उपायांची तातडीने अंमलबजावणी करावी लागेल.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवसैनिकांकडून अभिवादन




हिंगोली : हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस कळमनुरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ऑफिसमध्ये पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी खासदार शिवाजी माने, शिवसेना जिल्हासंघटक बाळासाहेब मगर, युवासेना जिल्हाप्रमुख शिवा शिंदे, शिवसेना विधानसभाप्रमुख चंद्रकांत देशमुख, शिवसेना शहरप्रमुख संतोष सारडा, मार्केट कमिटीचे उपसभापती नितीन जिंतुरकर, शिवसेनेचे माजी नगरसेवक दादाराव डुरे, अरविंद पाटील, भगवानराव बेंद्रे पाटील, कांतराव शिंदे, रवि शिंदे यांच्यासह शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या विचारांना आणि हिंदुत्वाच्या कार्याला अभिवादन केले. बाळासाहेबांचे विचार व शिवसेनेची संघर्षशील परंपरा पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

गुहा शाळेचे मुख्याध्यापक अन्सार पठाण निलंबित!

देवळाली प्रवरा : राहुरी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील कथित बोगस विद्यार्थी नोंदणी आणि पटसंख्या फेरफार प्रकरणाला आता मोठे वळण मिळाले आहे. गुहा ता.राहुरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अन्सार गुलाब पठाण यांना निलंबित करण्यात आले आहे. राहुरी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने आज सकाळी त्यांना निलंबनाचा आदेश बजावला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

अन्सार पठाण यांच्याविरोधात करण्यात आलेल्या चौकशीत अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्याचे निलंबन आदेशात नमूद करण्यात आले आहे. शाळेत विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित नसतानाही बोगस हजेरी लावणे,विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत नसतानाही विद्यार्थ्यांच्या दाखल्याची नोंदणी करणे, विद्यार्थी हजेरीपटावर खोटी माहिती नोंदविणे, शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना न करणे, शालेय कामकाज व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी न करणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांशी उद्धट वर्तन करणे तसेच शासकीय दप्तर तपासणीस नकार देणे, असे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत. निलंबन कालावधीत पठाण यांनी नेवासा पंचायत समिती येथे हजेरी लावण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.



कहाकर बुद्रुक चौकशी समितीच वादाच्या भोवऱ्यात!; अधिकृत नोटीस देऊनही समिती गावात फिरकली नाही

सायंकाळी 5 वाजेपर्यंत ग्रामस्थांची प्रतीक्षा; दोषींना वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याचा तक्रारदारांचा आरोप; चौकशी समितीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली: सेनगाव तालुक्यातील कहाकर बुद्रुक ग्रामपंचायतीमधील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतील कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने नियुक्त केलेली चार सदस्यीय चौकशी समिती आता स्वतःच वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. समितीने अधिकृत लेखी नोटीस देऊन १७ नोव्हेंबर रोजी गावात प्रत्यक्ष चौकशीसाठी येणार असल्याचे कळविले होते. मात्र, मंगळवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत समितीतील एकही अधिकारी गावात दाखल झाला नाही. दिवसभर पुराव्यांसह समितीची वाट पाहणाऱ्या ग्रामस्थांना अखेर निराश होऊन परतावे लागले. त्यामुळे ही प्रशासकीय दिरंगाई आहे की चौकशी टाळण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न, असा सवाल उपस्थित होत आहे.

दुसऱ्या गावांचे फोटो, बोगस ठरावांचा आरोप

कहाकर बुद्रुक ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीत कथित गैरव्यवहार झाल्याची तक्रार डॉ. अमोल शिवाजी खंडागळे व इतर ग्रामस्थांनी केली होती. दुसऱ्या गावांचे फोटो दाखवून कामे झाल्याचे भासविणे, बोगस ठराव मंजूर करणे तसेच डिजिटल पद्धतीने फसवणूक करून लाखो रुपयांचा निधी हडप केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या तक्रारीची दखल घेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी ३० ऑक्टोबर २०२६ रोजी चार सदस्यीय चौकशी समिती नियुक्त केली होती. संबंधित समितीने गावात प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी करावी आणि १५ दिवसांच्या आत अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले होते.

अधिकृत नोटीस, तरीही समितीची अनुपस्थिती

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार चौकशी समितीने १७ नोव्हेंबर रोजी कहाकर बुद्रुक येथे प्रत्यक्ष पाहणी करण्याबाबत अधिकृत नोटीस जारी केली होती. त्यामुळे तक्रारदार डॉ. खंडागळे यांच्यासह



ग्रामस्थांनी आवश्यक कागदपत्रे व पुरावे जमा करून समितीच्या आगमनाची प्रतीक्षा केली.

मात्र, निर्धारित दिवशी सायंकाळी ५ वाजेपर्यंत समितीतील एकही अधिकारी गावात पोहोचला नाही. यासंदर्भात तक्रारदारांनी समितीचे अध्यक्ष यांच्याशी वेळोवेळी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे डॉ. खंडागळे यांनी सांगितले. त्यामुळे चौकशीच्या पारदर्शकतेबाबत ग्रामस्थांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

चार वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती

या चौकशी समितीमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) के. एल. गड्डपोड यांची अध्यक्ष म्हणून, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) व्ही. एस. बोराटे यांची उपाध्यक्ष म्हणून, विस्तार अधिकारी व्ही. एस. भोजे यांची सदस्य म्हणून, तर कनिष्ठ अभियंता संदेश जाधव यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

इतक्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या समितीने अधिकृतपणे निश्चित केलेल्या दिवशी गावात उपस्थित न राहिल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

चौकशी लांबल्याने कामे घाईघाईने उरकण्याचा आरोप

दरम्यान, चौकशी समितीच्या प्रत्यक्ष पाहणीला विलंब होत असल्याचा फायदा घेऊन ग्रामपंचायतीतील काही अपूर्ण कामे घाईघाईने पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप डॉ. खंडागळे यांनी केला आहे. तक्रार दाखल झाल्यानंतर शाळेतील गट्टूचे काम तसेच दत्त मंदिरातील शौचालयाचे काम अचानक सुरू करण्यात आल्याचा त्यांचा दावा आहे. या कामांचे जीपीएस (GPS) फोटो आपल्याकडे उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

चौकशी समिती वेळेत दाखल झाली असती, तर संबंधित कामांची प्रत्यक्ष परिस्थिती तपासता आली असती. मात्र, समितीच्या अनुपस्थितीमुळे पुराव्यांमध्ये फेरफार होण्याची शक्यता निर्माण होत असल्याची चिंता तक्रारदारांनी व्यक्त केली आहे. या आरोपांची अधिकृत चौकशी होणे आवश्यक आहे.

आता सीईओंच्या भूमिकेकडे लक्ष

चौकशी समिती गावात का पोहोचली नाही, याबाबत अधिकृत बाजू जाणून घेण्यासाठी प्रतिनिधीने समितीच्या अध्यक्षांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे समितीच्या अनुपस्थितीमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी १५ दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असताना प्रत्यक्ष पाहणीच झाली नसल्याने आता जिल्हा परिषद प्रशासन याची काय दखल घेणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. चौकशी समिती गावात प्रत्यक्ष पाहणी कधी करणार? तक्रारीतील आरोपांची निष्पक्ष चौकशी होणार का? तसेच निर्धारित वेळेत गावात न पोहोचलेल्या समितीच्या अनुपस्थितीबाबत प्रशासन काय भूमिका घेणार? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

कहाकर बुद्रुक ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी आणि दोषींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

शिर्डीत उभारणार ताज समूहाचे पंचतारांकित हॉटेल; फडणवीसांच्या उपस्थितीत करार!



मुंबई: शिर्डी विमानतळ परिसरातील पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्राला चालना देण्याच्या दृष्टीकोनातून पंचतारांकित हॉटेल विकसित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी आणि दी इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेड म्हणजेच ताज समूह यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज मंत्रालयात सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे शिर्डी विमानतळ परिसरात विमान प्रवाशांसह देश-विदेशातून येणाऱ्या साईभक्तांना दर्जेदार निवास आणि आदरातिथ्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या सामंजस्य करारासाठी वनमंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

शिर्डी हे देशातील प्रमुख धार्मिक पर्यटनस्थळ आहे. श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक भक्त तेथे दर्शनासाठी येत असतात. शिर्डी विमानतळामुळे या भागाची हवाई कनेक्टिव्हिटी वाढली असून, विमानतळाच्या परिसरात जागतिक दर्जाच्या सुविधा विकसित होईल व पंचतारांकित हॉटेलच्या उभारणीमुळे शिर्डीच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी टाटा समूह आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला शुभेच्छा देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ताज समूहासारख्या नामांकित हॉटेल उद्योगसमूहाच्या सहभागामुळे शिर्डी विमानतळासह परिसराच्या विकासाला चालना मिळेल. या प्रकल्पांच्या माध्यमातून पर्यटनवाढीसोबतच स्थानिक अर्थव्यवस्थेला आणि रोजगारनिर्मितीलाही हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

तसेच शिर्डी विमानतळाच्या विकासामुळे शिर्डीच्या धार्मिक पर्यटनाला आणि परिसराच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याने शिर्डी विमानतळाच्या कामालाही अधिक गती द्यावी असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला दुष्काळ निवारणासाठी 15 लाखांचा निधी - बावनकुळेंची घोषणा

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्रत्येक ग्रामपंचायतीला १५ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या निधीतून स्थानिक गरजांनुसार जलसंधारण आणि ग्रामविकासाची कामे हाती घेण्यासाठी स्वतंत्र आराखडा तयार केला जाणार असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी केली. त्याचबरोबर वनपट्टा मिळाल्यानंतरही जमिनीचे स्वामित्व न मिळालेल्या आदिवासी शेतकऱ्यांना ७-ई आणि १२-ई प्रॉपर्टी कार्ड देण्याचा निर्णयही त्यांनी जाहीर केला. पत्रकारांशी संवाद साधताना बावनकुळे यांनी राज्य सरकारच्या दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांची माहिती दिली. ते म्हणाले, दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्यातील ११ विभागांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, जलसंधारण आणि महसूल यांसह विविध विभागांच्या योजनांच्या अंमलबजावणीत बदल करून दुष्काळ निवारणाच्या कामांना प्राधान्य दिले जात आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अनावश्यक कामे थांबवून आवश्यक उपाययोजनांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. चारा संवर्धनापासून जलसंधारणापर्यंत सरकारने आतापर्यंत ४५ ते ४६ निर्णय घेतले असून, त्यातून दुष्काळाचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. प्रत्येक ग्रामपंचायतीला देण्यात येणाऱ्या १५ लाख रुपयांच्या निधीतून गावपातळीवरील गरजांनुसार जलसंधारण आणि ग्रामविकासाची कामे नियोजनबद्ध पद्धतीने करता येतील. यासाठी स्वतंत्र आराखडा तयार केला जाणार आहे. दुष्काळी भागांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढवणे आणि स्थानिक पातळीवर आवश्यक कामे मार्गी लावणे, हा या नियोजनाचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे वनहक्क कायद्यांतर्गत वनपट्टा मिळाला असला, तरी जमिनीचे स्वामित्व दर्शवणारी कागदपत्रे अद्याप न मिळालेल्या आदिवासी शेतकऱ्यांना आता ७-ई आणि १२-ई प्रॉपर्टी कार्ड देण्यात येणार आहेत.

वनामकृवि व रिलायन्स फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाइन शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रमात 120 पेक्षा अधिक शेतकऱ्यांचा सहभाग

चारा व पाण्याचे योग्य नियोजन आणि शास्त्रीय व्यवस्थापनातून दुष्काळात पशुधनाचे संरक्षण शक्य – डॉ. नितीन मार्कंडेय

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण संचालनालया अंतर्गत परभणी येथील विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र आणि रिलायन्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खेत बचाओ अभियान – २०२६ अंतर्गत १२४ वा ऑनलाइन शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रम दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वात विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली दर शुक्रवारी सायंकाळी ७ वाजता करण्यात येते. यामध्ये दर आठवड्याला एका महत्त्वपूर्ण विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करून शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले जाते.

या कार्यक्रमाला विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख आणि विस्तार कृषि विद्यावेत्ता डॉ. गजानन गडदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

१२४ व्या कार्यक्रमात शिक्षण संचालक तथा पशुधन तज्ज्ञ डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी पशुपालक शेतकऱ्यांना उपलब्ध चाऱ्याचे शास्त्रीय दृष्टिकोनातून नियोजन करण्याचे आवाहन केले. उपलब्ध चारा, त्याची गुणवत्ता आणि जनावरांची गरज लक्षात घेऊन योग्य व्यवस्थापन केल्यास प्रतिकूल परिस्थितीतही उपलब्ध साधनसंपत्तीच्या आधारे पशुधनाचे चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करणे शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्य मार्गदर्शन करताना पशुवैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. नितीन मार्कंडेय यांनी दुष्काळसदृश परिस्थितीत चारा व पाण्याचे योग्य नियोजन, निकृष्ट चाऱ्यावर शास्त्रीय प्रक्रिया आणि जनावरांच्या आरोग्याची योग्य काळजी घेतल्यास पशुधनाचे संरक्षण करणे शक्य असल्याचे प्रतिपादन केले. उपलब्ध साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर करून जनावरांना संतुलित आहार उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांचे आरोग्य व उत्पादकता टिकवून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

पुढे त्यांनी दुष्काळसदृश परिस्थितीत पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली. जनावरांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करणे, चाऱ्याचा काटकसरीने व कार्यक्षम वापर करणे तसेच जनावरांना संतुलित आहार व आवश्यक पोषणमूल्ये मिळतील याची दक्षता घेणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण, गोठा व्यवस्थापन, स्वच्छता आणि विविध आजारांपासून पशुधनाचे संरक्षण याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी निकृष्ट चाऱ्यावर शास्त्रीय प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन करण्यावर विशेष भर दिला. शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेले सोयाबीनचे काड, उसाचे वाढे, गव्हाचे काड, तसेच शेतातील हिरवा चारा व विविध प्रकारचा पालापाचोळा यांचा योग्य पद्धतीने वापर करून चारा टंचाईवर मात करता येऊ शकते, असे त्यांनी नमूद केले. उपलब्ध निकृष्ट चाऱ्यावर योग्य प्रक्रिया केल्यास त्याचा दर्जा व पौष्टिकता वाढविता येते. यासाठी आवश्यकतेनुसार विविध विकरे (एन्झाइम्स), पूरक घटक आणि इतर शास्त्रीय प्रक्रिया तंत्रांचा वापर करून चारा अधिक पचनीय व पौष्टिक बनविता येतो. अशा प्रक्रियायुक्त चाऱ्याचा संतुलित पशुआहारात योग्य प्रमाणात समावेश केल्यास चाऱ्याची उपलब्धता कमी असतानाही जनावरांच्या पोषणाच्या गरजा पूर्ण करणे शक्य होते.

त्यामुळे शेतकऱ्यांनी उपलब्ध साधनसंपत्तीचा शास्त्रीय पद्धतीने वापर करून निकृष्ट चाऱ्याचे मूल्यवर्धन करावे. अशा नियोजनबद्ध उपाययोजनांमुळे दुष्काळसदृश परिस्थितीत चारा टंचाईची तीव्रता कमी करण्यासोबतच पशुधनाचे आरोग्य व उत्पादकता टिकवून ठेवणे शक्य होईल, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यापीठाचे हवामान तज्ज्ञ डॉ. कैलास डाखोरे यांनी आगामी आठवड्यातील हवामानाचा अंदाज सादर केला. आगामी काळातील हवामान परिस्थिती, पावसाची शक्यता तसेच हवामानातील बदल लक्षात घेऊन शेतकरी बांधवांनी शेती आणि पशुधन व्यवस्थापनाचे नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच आगामी आठवड्यातील संभाव्य हवामान परिस्थितीविषयी सविस्तर माहिती दिली.

प्रास्ताविक डॉ. गजानन गडदे यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करताना सध्याच्या दुष्काळसदृश्य परिस्थितीत पशुधनाचे संरक्षण व योग्य व्यवस्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांना शास्त्रीय मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने आजच्या विषयाची निवड करण्यात आल्याचे सांगितले.

महाराष्ट्रात थंडी, ऊन आणि पावसाचा तिहेरी अनुभव; 'अकवन' चक्रीवादळामुळे विदर्भात पावसाचा इशारा

मुंबई: महाराष्ट्रात सध्या हवामानाचे वेगवेगळे रूप पाहायला मिळत आहे. उत्तर महाराष्ट्र आणि घाटमाथ्याच्या भागात थंडीचा कडाका जाणवत असताना, काही ठिकाणी दिवसा उन्हाचा चटका वाढला आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरात तयार झालेले 'अकवन' (Akvan) चक्रीवादळ अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ 20 नोव्हेंबर रोजी आंध्र प्रदेश आणि यानमच्या किनारपट्टीवर धडकण्याचा भारतीय हवामान विभागाचा (IMD) अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील काही भागांतही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ अधिक तीव्र होणार

बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्राचे रूपांतर चक्रीवादळात झाले असून, त्याची तीव्रता वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हे चक्रीवादळ 20 नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास आंध्र प्रदेशातील नेल्लोर आणि तुनीदरम्यानच्या किनारपट्टीवर धडकण्याचा अंदाज आहे. त्यावेळी वाऱ्यांचा वेग ताशी 120 ते 130 किलोमीटर, तर झोतांचा वेग ताशी 145 किलोमीटरपर्यंत



पोहोचू शकतो.

महाराष्ट्रात कुठे पावसाची शक्यता?

चक्रीवादळाचा महाराष्ट्रावर थेट परिणाम अपेक्षित नसला, तरी त्याच्या प्रभावामुळे काही भागांत हवामानात बदल होऊ शकतो. हवामान विभागाच्या 16 नोव्हेंबरच्या अंदाजानुसार, 21 नोव्हेंबर रोजी पूर्व विदर्भातील काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस, तर तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे विदर्भातील नागरिकांनी हवामान विभागाच्या पुढील सूचनांकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

उत्तर महाराष्ट्रात थंडी, तर दिवसा उन्हाचा चटका

राज्यात उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे रात्री आणि पहाटे गारठा वाढल्याचे चित्र आहे. उत्तर महाराष्ट्र आणि घाटमाथ्याच्या भागात थंडी जाणवत असून, कोकणातील काही भागांतही तापमानात घट झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र, दिवसा उन्हाचा चटका कायम असल्याने सकाळ-संध्याकाळ गारवा आणि दुपारी उष्णता अशी स्थिती अनुभवायला मिळत आहे.

एल निनोचा पुढील हवामानावर परिणाम?

एल निनोच्या प्रभावामुळे आगामी काळातील तापमान आणि मान्सूनच्या वाऱ्यांवर काय परिणाम होणार, याकडे हवामान अभ्यासकांचे लक्ष आहे. मात्र, त्याचा नेमका परिणाम आणि कालावधी याबाबत अधिकृत हवामान अंदाजांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवस महाराष्ट्रातील हवामानात होणारे बदल लक्षात घेऊन नागरिकांनी स्थानिक हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

ग्रामीण विकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा; खासदार संदिपान भुमरे यांची ठोस भूमिका

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ वेळेत आणि पारदर्शकपणे मिळावा, तसेच विकासकामांचा दर्जा आणि गुणवत्ता कायम राखली जावी, यावर खासदार संदिपान भुमरे यांनी भर दिला. तामिळनाडूतील निलगिरी जिल्ह्यातील उटी येथे १७ नोव्हेंबर रोजी झालेल्या ग्रामीण विकास आणि पंचायतराजविषयक संसदीय स्थायी समितीच्या बैठकीत त्यांनी रोजगार हमी, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या अंमलबजावणीतील विविध प्रश्न उपस्थित केले.

या बैठकीत समितीचे सदस्य म्हणून बोलताना भुमरे यांनी ग्रामीण भागातील शेतकरी, महिला, मजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांपर्यंत योजनांचा लाभ कोणत्याही अडथळ्याविना पोहोचला पाहिजे, अशी भूमिका मांडली. यावेळी पंचायत राज मंत्रालयाचे केंद्रीय सचिव विनीत जोशी, संयुक्त सचिव मुक्त शेखर, पालका साहनी, अमित अग्रवाल, राजेश कुमार सिंह यांच्यासह केंद्र शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच तामिळनाडूच्या ग्रामीण विकास व पंचायतराज विभागाचे अतिरिक्त संचालक अरुणमणी, सॅम्युअल इनबादुराई, सुमथी, एस. एस. कुमार, एन. कालिदास, शिवकुमार, सहाय्यक संचालक सेतुकुमार, निलगिरीचे जिल्हाधिकारी आणि राज्य शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

रोजगार हमी योजनेच्या आढाव्यादरम्यान व्हीबी-जी राम जी योजनेंतर्गत १२५ दिवसांच्या रोजगार हमीची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज त्यांनी मांडली. ग्रामीण भागात रोजगाराची मागणी वाढल्यास अतिरिक्त निधी आणि मनुष्यदिवस उपलब्ध करून देण्याची व्यवस्था काय आहे, याची माहिती मागितली. मागील तीन वर्षांत ग्रामरस्ते, तलाव पुनरुज्जीवन, शेततळी आणि सिंचनाची किती कामे पूर्ण झाली, याचाही आढावा घेण्याची मागणी केली. पूर्ण झालेल्या कामांचे स्वतंत्र मूल्यमापन करून त्यांच्या गुणवत्ता आणि उपयोगितेची तपासणी करावी. महिलांसाठी कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृहे, बालसंगोपन आणि प्राथमिक उपचारांच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच निधी वितरणासाठी केंद्र व राज्य शासनात समन्वय ठेवावा, अशा सूचना त्यांनी केल्या.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणबाबत बोलताना पात्र असूनही लाभार्थी यादीत समावेश न झालेल्या गरीब कुटुंबांचे नव्याने सर्वेक्षण करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. प्रलंबित घरकुलांची कामे पूर्ण करण्यासाठी विशेष अभियान राबवावे. मंजूर घरकुलांचे हप्ते वेळेत मिळत नसल्याने अनेक कुटुंबांचे बांधकाम रखडते. त्यामुळे जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर घरकुलांची प्रगती, निधी वितरण आणि लाभार्थ्यांच्या तक्रारींचा नियमित आढावा घेणारी यंत्रणा उभारावी. कामात विनाकारण विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामांमध्ये गुणवत्तेशी तडजोड होता कामा नये, असे स्पष्ट करत त्यांनी रस्त्यांच्या टिकाऊपणा आणि देखभालीचा मुद्दा उपस्थित केला. बांधकामानंतर काही महिन्यांतच रस्ते खराब झाल्यास संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली जाते, कामांचे स्वतंत्र तांत्रिक परीक्षण होते का आणि पुढील पाच वर्षांच्या देखभालीची जबाबदारी कशी निश्चित केली जाते, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. गावांना मुख्य रस्ते, तहसील कार्यालये, जिल्हा मुख्यालये, रुग्णालये आणि कृषी बाजारपेठांशी जोडण्यासाठी प्राधान्यक्रमाने रस्ते विकास आराखडा तयार करण्याची सूचनाही त्यांनी केली.

ग्रामीण विकास मंत्रालयाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत मंजूर निधीचा योग्य विनियोग, कामांची निर्धारित वेळेत पूर्तता, गुणवत्तेची तपासणी आणि नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण यावर नियमित देखरेख ठेवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांमध्ये समन्वय ठेवून योजनांचे पारदर्शक मूल्यमापन करावे आणि अनियमितता आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती, घरकुल, रस्ते, सिंचन आणि मूलभूत सुविधांचा विकास हा देशाच्या प्रगतीचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून ग्रामीण नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, असा आग्रह खासदार संदिपान भुमरे यांनी बैठकीत धरला.

परिसरातील शेतकरी, नागरिकांशी गुलाबराव कोलते यांनी साधला संवाद



सावळदबारा प्रतिनिधी : भाजपचे जिल्हाध्यक्ष सुरेश पाटील बनकर व भाजपचे अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राज्यमंत्री दर्जा इद्रिस मुलतानी यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी सोमवारी दि. १६ नोव्हेंबर रोजी सावळदबारा परिसरातील विविध गावांना भेटी देऊन शेतकरी व नागरिकांशी संवाद साधला.

सावळदबारा, देव्हारी, मोलखेडा, घाणेगाव,डाभा, नादातांडा, , टिटवी, जामठी, पळसखेडा, पिंपळवाडी,रवळा,महालब्धा,हिवरी आदी गावांतील शेतकरी आणि नागरिकांशी भेट घेऊन चर्चा केली.विविध माहिती दिली

सावळदबारा सह परिसरातील गावांना भेटी देऊन शेतकरी नागरिकांना विविध माहिती दिली भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी

भाजपचे जिल्हाध्यक्ष सुरेश पाटील बनकर व भाजपचे अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राज्यमंत्री दर्जा इद्रिस मुलतानी यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी सावळदबारा सह परिसरातील विविध गावांना भेटी देऊन शेतकरी व नागरिकांशी संवाद साधला आहेत

प्रवेश अर्ज करण्यासाठी 25 नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जमाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत व्यावसायिक व अव्यावसायिक विद्यार्थ्यांनी सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात विद्यमान प्रवेशित विद्यार्थ्यांना ऑफलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांनी येत्या 25 नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच परभणी जिल्ह्यातील तालुक्यांच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयात व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन 2026-27 या शैक्षणिक वर्षांत विद्यमान प्रवेशित विद्यार्थ्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी अर्ज करावेत, असे आवाहन इतर मासाग बहुजन कल्याणचे सहायक संचालक रामेश्वर मुंडे यांनी केले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चार महत्त्वाचे निर्णय, पालघर जिल्ह्याचा झोन-4 काढून झोन- 1 मध्ये समावेश



मुंबई : राज्य मंत्रिमंडळाची नियोजित आठवड्याची बैठक मंगळवारी मंत्रालयात पार पडली. यावेळी राज्य सरकारने प्रशासकीय पातळीवरील चार महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यानुसार नक्षलवाद्यांनी (Naxal) सुरक्षा दलांकडून यापूर्वी लुटून नेलेल्या शस्त्रांबाबत माहिती देणाऱ्यांसाठी रोख बक्षीस योजना जाहीर करण्यात आली आहे. तसेच पालघर जिल्ह्याबाबत (Palghar District) दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणात सुधारणा करुन पालघर जिल्ह्याचा आता झोन-1 मध्ये समावेश करण्यात आला आहे. झोन-4 वर्गवारी रद्द आणि विस्तारीकरण नियमातही बदल करण्यात आला आहे.

मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त)

• नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांकडून यापूर्वी लुटून नेलेल्या शस्त्रांबाबत माहिती देणाऱ्यांसाठी रोख बक्षीस योजना. (गृह विभाग)

• राज्यातील उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने शैक्षणिक क्षेत्रात होऊ घातलेले बदल लक्षात घेऊन सुधारणा करण्यात येणार. (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

• एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणात सुधारणा. पालघर जिल्ह्याचा आता झोन-1 मध्ये समावेश. झोन-4 वर्गवारी रद्द आणि विस्तारीकरण नियमातही बदल. (वस्त्रोद्योग विभाग)

• पालघर जिल्ह्यासाठी पालघर येथे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय तसेच मुख्य दंडाधिकारी न्यायालयाची स्थापना होणार. सरकारी वकील कार्यालयांसह अनुषांगिक पदांच्या निर्मितीस मंजुरी. (विधि व न्याय विभाग)

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांचा एका महिन्याचा पगार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी- सुनेत्रा पवार

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांना आर्थिक मदत मिळावी, या उद्देशाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विधानसभा व विधान परिषदेतील सर्व आमदारांनी आपले एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आज मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या हस्ते या वेतनाचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवना येथे अभिवादन



अजिंठा प्रतिनिधी - : शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज शिवसेना कार्यालय, शिवना येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य राजुबाबा काळे यांनी स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. उपस्थित मान्यवरांनीही बाळासाहेब ठाकरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य राजुबाबा काळे, रावकाका, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संदीप राऊत, माजी सरपंच गणेश सपकाळ, शामराव होळकर, योगेश सपकाळ, साहेबराव काळे, सोहम काळे, श्रीहरी काळे, दीपक वाघ, अंकुश भाऊ, गजानन शेळके, सागर राऊत, अमोल शेळके आदींची उपस्थिती होती.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना यावेळी सर्वांनी विनम्र अभिवादन केले

परिषद शाळेत भरली माजी विद्यार्थ्यांची शाळा



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

उंडणगाव : सिल्लोड तालुक्यातील उंडणगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या १९९१ मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांची शाळा तब्बल ३५ वर्षांनंतर पुन्हा एकदा भरली. रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या स्नेहमेळाव्यात माजी वर्गमित्र एकत्र आले. यावेळी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत जुन्या मैत्रीचा धागा पुन्हा घट्ट करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, शाळेची प्रार्थना आणि प्रतिज्ञेने करण्यात आली. यावेळी दिवंगत वर्गमित्रांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर उपस्थित माजी शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेतील गंमतीजमती, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.

या बॅचमधील अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत. आपल्या यशामागे शाळेतील शिक्षकांचे अनमोल मार्गदर्शन आणि त्यांनी दिलेले संस्कार असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. शाळेविषयीची कृतज्ञता व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेला १० खुर्च्या भेट देण्यात आल्या.

तब्बल साडेतीन दशकांनंतर झालेल्या या भेटीमुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. जुन्या आठवणी, हास्यविनोद आणि आपुलकीच्या गप्पांमध्ये वेळ कसा गेला, हे कोणालाच कळले नाही. शेवटी सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेत खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रमाची सांगता केली.

यांची होती उपस्थिती : कार्यक्रमाला माजी मुख्याध्यापक विठ्ठलराव धनवई, हिवराळे सर, पाखरे सर, बळवंत महाजन, हिवाळे सर, शामराव दौड, बळवंत खोंडे, गोविंदा सोनवणे, गोसावी सर, मुख्याध्यापक संदीप पाथ्रीकर यांच्यासह माजी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

अहिल्यानगर मनपात महापौरांचा अचानक छापा; उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना लेटमार्कचा दणका

अहिल्यानगर (प्रतिनिधी) : अहिल्यानगर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांमध्ये कार्यालयीन वेळेच्या शिस्तीचा अभाव असल्याचे मंगळवारी (दि. 17 नोव्हेंबर) महापौर सौ. ज्योतीताई अमोल गाडे यांच्या निदर्शनास आले. सकाळी 9.30 वाजता महापौर गाडे महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात दाखल झाल्या असता, बहुतांश कर्मचारी निर्धारित वेळेत कामावर हजर नसल्याचे आढळून आले. या प्रकाराची गंभीर दखल घेत महापौरांनी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हजेरी मस्टरची तपासणी करून त्यांच्या हजेरी पत्रकावर लेटमार्क नोंदविण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

महापौर ज्योती गाडे यांनी उशिरा कामावर आलेल्या कर्मचाऱ्यांचे हजेरी मस्टर बुक ताब्यात घेऊन तपासणी केली. त्यावर उशिराचा शेरा मारत संबंधित कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रकावर लेटमार्क नोंदविण्याची कार्यवाही सुरू केली. तसेच महापालिकेतील विविध विभागांच्या कार्यालयांची पाहणी करून त्यांनी नाराजी व्यक्त केली.

नागरिक आपल्या विविध कामांसाठी सकाळी 10 वाजल्यापासून महापालिकेत येत असतात. मात्र, कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्यामुळे नागरिकांची कामे वेळेत मार्गी लागत नाहीत. यावेळी पुण्याहून दाखला मिळविण्यासाठी एक महिला सकाळी पावणेदहा वाजता महापालिकेत आल्या होत्या. मात्र, ज्या विभागात त्यांचे काम होते, त्या विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित नसल्यामुळे संबंधित महिलेने नाराजी व्यक्त केली.

हा प्रकार पाहून महापौरांनी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारावरच खुर्ची टाकून महापौर ज्योतीताई गाडे यांनी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची तपासणी केली. यावेळी त्यांनी कार्यालयीन शिस्तीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन करणे अपेक्षित असताना बहुतांश कर्मचारी वेळेत उपस्थित नसल्याचे चित्र समोर आले. त्यामुळे महापौरांनी यापुढे कर्मचाऱ्यांच्या वेळेतील अनियमिततेकडे दुर्लक्ष केले जाणार नसल्याचे स्पष्ट केले. उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रकावर नियमानुसार लेटमार्क नोंदविण्याचे निर्देशही त्यांनी महापालिका प्रशासनाला दिले.

महापौरांच्या या अचानक पाहणीमुळे महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. दरम्यान, लेटमार्कची नोंद झालेल्या कर्मचाऱ्यांवर महापालिका प्रशासनाकडून पुढे नेमकी काय कारवाई केली जाणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी; जनावर चोरीच्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश!



परभणी पोलिसांचा जनावर चोरट्यांना दणका! जनावरे चोरी करणारी टोळी जेरबंद; 05 गुन्ह्यांची उकल, 1.90 लाखांची रोकड जप्त!

परभणी पोलिसांकडून जनावर चोरीच्या मालिकेचा छडा;

परभणी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील जनावर चोरीच्या गुन्ह्यांची उकल.

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी **शहर व ग्रामीण हद्दीतील जनावरे चोरी मधील पाहिजे आरोपीतांचा शोध सुरु असताना जनावरे चोरी करणाऱ्या टोळीबाबत माहिती मिळाल्यानंतर पाहिजे आरोपी 1.शेख खालिद उर्फ अशफाक उर्फ असलम (वय ३५) आणि 2.नदीम मोईन कुरेशी (वय २३), दोघेही सध्या रहमाननगर, सेलू यांना ताब्यात घेऊन त्यांना विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने त्याचे इतर साथीदार यांचे मदतीने खालील प्रमाणे परभणी शहर सह पालम, गंगाखेड, मानवत, पाथरी, जिंतुर हद्दीतील *या पूर्वी केलेले 15 गुन्हे व 05 गुन्हे* केल्याचे कबूल करून नमूद गुन्ह्यातील चोरी केलेल्या जनावरे यांची कत्तल करून मास विक्रीतून मिळेवलेली *एकुण 1 लाख 90 हजार रु* हजर केल्याने जप्त केले आहेत.

नमूद आरोपी विरुद्ध खालील प्रमाणे जनावर चोरीतील एकुण 05 गुन्हे उघड झाले आहेत.*

आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांसाठी परभणीत सोमवारी भरती मेळावा

परभणी : जिल्ह्यातील आयटीआय उत्तीर्ण तसेच अंतिम वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या युवक-युवतींना रोजगाराभिमुख संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी योजना आणि प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना अंतर्गत शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा सोमवार, (दि.23) रोजी सकाळी 10 वाजता औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), परभणी येथे होणार आहे.

मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, परभणी आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भरती मेळाव्यात विविध आस्थापनांमार्फत शिकाऊ उमेदवारांची निवड केली जाणार असून, निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा 10 हजार ते 16 हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन मिळणार आहे. या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर, पुणे यासह राज्यातील इतर ठिकाणच्या विविध आस्थापनांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील युवकांना विविध आस्थापनांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्यासोबतच कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्यातील आयटीआय उत्तीर्ण उमेदवार, अंतिम वर्षात प्रशिक्षण घेत असलेले प्रशिक्षणार्थी तसेच इतर पात्र उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह या भरती मेळाव्यास उपस्थित राहून उपलब्ध संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्राचे सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार विकास आडे यांनी केले आहे.

कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथील संपूर्ण डोंगरावरच्या गवताची पाच ग्रासकटर मशीन्सच्या सहाय्याने केली साफसफाई !.

झाडं लावणं सोपं,पण जगवणं खूप कठीण



उरण दि १७(विठ्ठल ममताबादे) सामाजिक जाणिवतेच्या संस्कारांतून पर्यावरणाच्या व निसर्ग संवर्धनाच्या आणि संरक्षणाच्या कार्याकरीता सदैव तत्पर असणारी मंडळी कधीच स्वस्थ बसत नसतात ह्याच आदर्शवत उदाहरण पाहायला मिळालं ते उरण- सारडे गावातील सामाजिक कार्यकर्ते,निसर्गप्रेमी संपेश पाटील,रोशन पाटील,मिलन पाटील, क्रांती म्हात्रे,सुभाष पाटील, नवनीत पाटील,देविदास पाटील,आबा पाटील, माधव म्हात्रे,अनिल घरत आणि छोटे निसर्गप्रेमी बच्चे कंपनी मयुरेश,मयंक,रुंजह्या सर्व मंडळीनी केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक महाराष्ट्र भूषण राजू मुंबईकर यांच्या मार्गदर्शनाखाली सारडे गावातील कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे एक स्तुत्य उपक्रम राबवीत एक आदर्श निर्माण केला तो म्हणजे ह्या सर्व मंडळींच्या माध्यमातून व मेहनतीतून कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे लागवड केलेल्या शेकडों झाडांच्या सभोवताली वाढलेल्या गवताची साफसफाई करण्यासाठी तब्बल ५ पाच ग्रास कटर मशीन्सचा वापर करत कोमनादेवी ऑक्सिजन पार्कचा संपूर्ण परिसर आणि डोंगर माथ्यावर झाडांच्या बाजूला वाढलेले भयंकर प्रकारचे गवत ग्रास कटर मशीन्सच्या सहाय्याने कापून झाडांच्या आजुबाजुचा परिसर साफ करण्यात आला.

खरचं " झाडं लावणं खूप सोपं आहे,पण ती जगवणं. त्यांचे संवर्धन,संरक्षण करणं खूप कठीण कामं आहे.अगदी लहान मुलांसारखं जपावं लागतं त्या वनसंपदेला जगविण्यासाठी त्यांची खूप काळजी घ्यावी लागते.आणि ह्याच कोमनादेवी ऑक्सिजन पार्क मधल्या बहरलेल्या ह्या वृक्षसंपदेची गेले आठ - नऊ वर्षे सातत्याने आगदी लहान मुलांसारखी काळजी घेणारे हे खरे निसर्गप्रेमी रिअल हिरो संपेश पाटील,रोशन पाटील,मिलन पाटील ही सर्व मंडळी आणि सहकारी पावसाळा संपल्यानंतर ऑक्टोबर महिन्या पासून ते पावसाळा सुरू होई पर्यंत अगदी जून महिन्या पर्यंत दररोज सकाळी लवकर न चुकता गोल्डन ज्युबली मित्र मंडळाच्या आणि ग्रामपंचायत सारडेच्या माध्यमातून जोडण्यात आलेल्या बोअरवेलच्या पाण्याच्या पाईप लाईन मधून नळाद्वारे त्या कोमनादेवी ऑक्सिजन पार्क मधल्या शेकडों झाडांना पाणी देण्याच काम करतं असतात आणि म्हणुनच काही वर्षा पुर्वी ओसाड असलेल्या त्या डोंगर टेकडीवर हिरवागार वैभव बहरलयं. त्याचे नाव आहे कोमनादेवी ऑक्सिजन पार्क आणि त्याच वनराईतील झाडांभोवती वाढलेल्या गवताची साफसफाई करण्यासाठी केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर यांनी आपल्या स्व खर्चातून तीन रोजंदारीवरचे कामगार त्यांच्या मजुरी आणि ५ पाच ग्रास कटर मशीन्स दिले.संपूर्ण कोमनादेवी ऑक्सिजन पार्कचा परिसर आणि डोंगर माथ्यावरील गवताची साफसफाई करण्यात आली. त्याच सोबत तीन आठ फुटी उंच अशा वटवृक्षांची (वडाच्या झाडांची) देखील लागवड करण्यात आली.

पर्यावरण संवर्धनाच्या आणि संरक्षणाच्या प्रेरणादायी कार्यात श्रमदान करून विशेष सहकार्यरुपी मेहनत घेतली ती संपेश पाटील, रोशन पाटील,मिलन पाटील,सुभाष पाटील, क्रांती म्हात्रे गोल्डन ज्युबली मित्र मंडळाचे माजी अध्यक्ष नवनीत पाटील, अध्यक्ष माधव म्हात्रे, माजी उपाध्यक्ष आबा पाटील कार्याध्यक्ष देविदास पाटील,अनिल घरत आणि छोटे निसर्गप्रेमी मयुरेश, मयंक, रुंज ह्या सर्व मंडळीच्या सहकार्यातून कोमनादेवी ऑक्सिजन पार्क मध्ये निसर्ग संवर्धनाचं अनमोल कार्य साकार झाले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

चार नवीन तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश; उपसमितीच्या बैठकीत निर्णय

मुंबई : राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीत वाढ होत असून पिंपळगाव, दिंडोशी, वाडा आणि विक्रमगड हे चार तालुके दुष्काळग्रस्त यादीत आले आहेत. तर करवीर, हातकणंगले, गडहिंग्लज आणि कागलसह 9 तालुक्यांचे ग्राऊंड सर्व्हेक्षण करण्याचे आदेश महसूलमंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी दिले.

पाणीटंचाई निवारण, जलजीवन मिशनची अपूर्ण कामे आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीला राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मत्सव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, जलसंधारण मंत्री संजय राठोड, तसेच वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आदी मंत्रिमंडळातील प्रमुख मंत्री उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले, ग्राउंड सर्व्हेक्षण आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानुसार चार तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश करण्याबाबतचा विचार आहे. तसेच इतर 9 तालुक्यांच्या मागणीवर नव्याने सखोल सर्वेक्षण करण्याचे आदेश उपसमितीने दिले असून, पुढील बैठकीत त्यावर निर्णय घेतला जाईल. केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार आता 'वीबी-जी राम जी' योजनेअंतर्गत मका आणि ज्वारीच्या लागवडीला मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे शेतकरी आणि मजुरांना मोठा फायदा होणार असून या पिकांची लागवड मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.

जलजीवन मिशनच्या अपूर्ण योजना पूर्ण करून गावे टँकरमुक्त करण्यासाठी 83 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच ज्या गावांचे रेट्रोफिटिंग व 90 टक्के काम पूर्ण झाले आहे, त्यांच्या पाणीपुरवठा योजना सुरू करण्यासाठी 400 कोटी रुपये वितरित केले आहेत. जलसंपदा विभागाच्या मेकॅनिकल डिव्हिजनमधील यंत्रसामग्रीचा वापर करून राज्यातील सर्व जलसंधारण आणि जलसंपदेचे तलाव खोलीकरण करण्याचे निर्देश आजच्या बैठकीत देण्यात आले आहेत.(Indian Farmers)

जलसंपदा विभागाकडे मोठ्या प्रमाणावर यंत्रसामुग्री आहे. या यंत्रसामुग्रीचा वापर स्थानिक पातळीवरील तलाव आणि नाल्यांच्या खोलीकरण व गाळ काढण्यासाठी वापर केला जाणार आहे. मोठ्या प्रमाणावर ही यंत्रणा कार्यरत राहणार असून त्यामुळे दुष्काळाची तीव्रता भविष्यात कमी करण्यासाठी याचा उपयोग होईल. पीकविमा आणि पीकर्जाबाबतही आजच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी राज्यात मुख्यमंत्री दुष्काळ निवारण उपाययोजना राबविण्याबाबत चारा, जनावरे आणि दुष्काळ हटविण्याच्या उपाययोजना याबाबत सादरीकरणही करण्यात आले. पाण्याचे पुनर्भरण, तसेच जलसंधारणासाठी सुमारे 5 हजार कोटींचा आराखडा तयार करण्याचे आदेशही यावेळी बावनकुळे यांनी यावेळी दिले.

आता ऊसतोड मुलांसह गर्भवतींची होणार तपासणी

साखर कारखाने व पालांवर 0-18 वर्षाच्या मुले व महिलांना आरोग्य सेवा मिळणार; जिल्हा परिषद येथे बैठक संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.किशोर सूरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाची बैठक संपन्न.

जिल्हास्तरीय बैठकीत साहयक संचालक कूष्टरोग तथा शहरी आरोग्य अधिकारी,डॉ. श्रीनिवास कदम, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रावजी सोनवणे,जिल्हा माता व बाल आरोग्य अधिकारी डॉ.सतीश शिंदे, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय सांख्यिकी अधिकारी, जिल्हा मूल्यमापन सनियंत्रण अधिकारी, जिल्हास्तरीय लसीकरण पर्यवेक्षक व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत सहाय्यक संचालक कुष्ठरोग यांनी जिल्ह्यातील सर्व आरोग्यवर्धिनी केंद्रात देण्यात येणाऱ्या सेवा अधिक गुणवत्तापूर्ण प्रभावी देण्याबाबत सूचना दिल्या. माता बाल संगोपन सेवा,लसीकरण प्रामुख्याने करण्यात यावे. पाणी शुद्धीकरण, कीटक जन्य आजार सर्वेक्षण व संशयित रुग्णांची तपासणी,संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार सेवा, अहवाल संकलन व ऑनलाईन नोंदणी करणे,

पालकमंत्री आरोग्य दूत अभियान,माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानात, प्रामुख्याने लोकसहभाग अधिक व्यापक करण्यासाठी प्रभावी सेवा देण्याबाबत सूचना केल्या.

जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी यांनी ऊसतोड कामगारांच्या आरोग्य तपासणी करण्या अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

राज्यात सध्या ऊस गाळप हंगाम सुरू झाल्यामुळे मोठ्या संख्येने ऊसतोड कामगार आपल्या कुटुंबीयांसह साखर कारखान्यांच्या परिसरात आणि शेतशिवारातील तात्पुरत्या पालांमध्ये वास्तव्यास आले आहेत. या स्थलांतरित कामगारांसोबत असणारी लहान मुले आणि गर्भवती महिला नियमित आरोग्य तपासणीपासून



वंचित राहू नयेत, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने मोठे पाऊल उचलले आहे. सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री तथा पालकमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पत्रानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त संजय काटकर यांनी राज्यातील

० ते १८ वयोगटातील बालकांची '४-डी' तपासणी

या मोहिमेअंतर्गत ऊत्सतोड कामगारांच्या वस्त्यांची नोंद घेऊन ० ते १८ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाची राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम पथकामार्फत तपासणी केली जाणार आहे.

यामध्ये जन्मजात दोष, विविध आजार, पोषणातील कमतरता आणि विकासातील विलंब किंवा दिव्यांगत्व या चार निकषांनुसार बालकांचे वर्गीकरण केले जाईल.

बालकांची वर्गवारी करून त्यांच्यावर तातडीने मोफत उपचार किंया उच्चस्तरीय संदर्भसेवा निश्चित केली आणार आहे.

सर्व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना ऊसतोड कामगारांच्या वस्त्यांवर विशेष आरोग्य मोहीम राबवण्याचे निर्देश दिले आहेत. हे संपूर्ण सर्वेक्षण ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करून ७ डिसेंबरपर्यंत एकत्रित अहवाल तालूकास्तरून सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

गर्भवती मातांचे 'जननी पोर्टल'वर रजिस्ट्रेशन अन् उपचार

वस्तीतील प्रत्येक ऊसतोड गर्भवती महिलेची स्वतंत्र प्रसूतीपूर्व तपासणी सर्वेक्षण केले जाईल. या महिलांच्या कार्डवर 'आभा क्रमांकाची नोंद करून त्यांची माहिती जननी पोटीचर अद्ययावत केली जाईल.

हिमोग्लोबिन, रक्तदाब, सोनोग्राफीसह लोह-रक्तातील साखर, एचआयव्ही व कैल्शियमच्या गोळ्या, लसीकरण करण्यात येईल. प्रत्येक महिन्याच्या महिन्याच्या ९, १८ आणि २७ तारखेला प्रधानमंत्री सुरक्षित आरोग्यतपासणी सेवा दिली जाणार .

* अ ति जो ख मी च्या गर्भवतींसाठी स्वतंत्र नोंदवही अन् मोफत रुग्णवाहिका*

सर्वेक्षणात गंभीर रक्तक्षय, उच्च रक्तदाब,मधुमेह, जुळी गर्भधारणा किंवा गुंतागुंतीची प्रसूती लक्षणे असलेल्या महिलांची अतिजोखमीची गर्भवती म्हणून स्वतंत्र नौद ठेवली जाईल.

राज्य वुशू अजिंक्यपद स्पर्धेसाठी ढोरेगावच्या पाच खेळाडूंची निवड

सांडा फाईट आणि लाठी-काठी प्रकारात जिल्हास्तरीय स्पर्धेत 2 सुवर्ण, 8 रौप्य पदकांची कमाई

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातही आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. ढोरेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या पाच विद्यार्थ्यांची सब-ज्युनिअर व सीनियर राज्य वुशू अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नागपूर येथे २१ व २२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या या स्पर्धेत हे खेळाडू छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.



राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सांडा फाईट प्रकारातून सुमेरा शब्बीर शेख, अनुज सागर खाजेकर आणि साद शब्बीर शेख, तर लाठी-काठी प्रकारातून आदित्य किशोर उमाप आणि फरहीन नय्युम शेख यांची निवड झाली आहे. विशेष म्हणजे, जिल्हा संघाच्या प्रशिक्षकपदाची जबाबदारी ढोरेगावचे क्रीडा निदेशक अली बाकोदा यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा वुशू असोसिएशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धा व निवड चाचणीत ढोरेगावच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केली. सांडा फाईट प्रकारात सुमेरा शब्बीर शेख, अनुज सागर खाजेकर, साद शब्बीर शेख, सोमनाथ जाधव, प्रणव सतीश आव्हाड, जोसेफ बबलू आणि राहील आलिम शेख यांनी, तर लाठी-काठी प्रकारात आदित्य किशोर उमाप, फरहीन नय्युम शेख आणि फरहान नय्युम शेख यांनी कौशल्याचे प्रदर्शन केले. या खेळाडूंनी एकूण दोन सुवर्ण आणि आठ रौप्य पदकांची कमाई केली. याच कामगिरीच्या जोरावर पाच खेळाडूंनी राज्यस्तरीय स्पर्धेत स्थान मिळविले.

शहरातील नामांकित क्रीडा अकॅडमींच्या खेळाडूंशी स्पर्धा करत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, जिद्द, नियमित सराव आणि पालकांचे प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले. क्रीडा शिक्षक अली बाकोदा, जिल्हा असोसिएशनचे सचिव महेश इंदापुरे, प्रशिक्षक मास्टर मुदस्सीर, बंटी राठोड आणि सुमीत खरात यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खलील पटेल, उपाध्यक्ष अशोक कांबळे व सर्व पदाधिकारी, सरपंच रजियाबी अयुब पटेल, गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे, शिक्षण विस्तार अधिकारी अनिलकुमार सकदेव, विजय दुतोंडे, विष्णू घुगे, केंद्रप्रमुख सचिन डमाळे, केंद्रीय मुख्याध्यापिका अंजली पुन्हे, राजेश हिवाळे तसेच ग्रामस्थ व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पदवीधर शिक्षक राजेश हिवाळे, मनोज घुले, शंकर राऊत, दिलीप धर्माधिकारी, भाऊसाहेब गाढवे, नीलिमा कुलकर्णी, मुग्धा निमसे, परमेश्वर मस्के, सचिन पाटसकर, शामीर शेख, अली बाकोदा आणि कल्याणी जगताप सातत्याने प्रयत्नशील आहेत. आता राज्यस्तरीय स्पर्धेत हे पाचही खेळाडू कशी कामगिरी करतात, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

शासनाच्या 29 सेवा आणि 18 योजनांची प्रक्रिया होणार अतिशय सुलभ; नवीन पोर्टल लवकरच होणार सुरु

मुंबई : कामगार विभागाच्या सेवा आणि योजनांचा लाभ नागरिकांना अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. कामगार विभागाच्या 29 सेवा आणि 18 योजनांच्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचनेस (GPR) अधिकृत मान्यता देण्यात आली आहे. या नव्या सुधारणांमुळे नागरिकांच्या कार्यालयीन फेऱ्या, अर्जातील किचकट रकाने, आवश्यक कागदपत्रांची संख्या, मंजुरीचे स्तर आणि सेवा मंजुरीचा एकूण कालावधी कमी होणार आहे, अशी माहिती कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली आहे.

प्रक्रिया पुनर्रचनेला मंजुरी

मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या राज्यस्तरीय शासकीय प्रक्रिया



पुनर्रचना समितीच्या बैठकीत कामगार विभागाच्या 29 जी-टू-बी (G2B) व जी-टू-सी (G2C) सेवा आणि 18 योजनांच्या प्रक्रिया पुनर्रचनेला अंतिम सहमती देण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर कामगार विभागाने शासन निर्णयाद्वारे या प्रक्रियेला औपचारिक मान्यता दिली आहे.

काय होणार बदल?

या पुनर्रचनेनुसार अर्जांची प्रक्रिया अधिक सोपी करण्यात आली असून आवश्यक कागदपत्रे, मंजुरीचे विविध स्तर तसेच अंतिम सेवा मान्यतेसाठीचे दाखले आणि प्रमाणपत्रांमध्ये आवश्यक ते सुधारीत बदल करण्यात आले आहेत. या सर्व सेवा व योजनांचा लाभ नागरिकांना आणि व्यावसायिकांना अत्यंत सहजपणे उपलब्ध करून देण्यासाठी एक स्वतंत्र आणि अत्याधुनिक पोर्टल तयार करण्यात येत असून, ते नजीकच्या काळातच कार्यान्वित होईल. या डिजिटल सुधारणेमुळे पारदर्शकता वाढून भ्रष्टाचाराला आळा बसेल आणि वेळेची मोठ्या प्रमाणावर बचत होईल.

कारेगावचे गोविंद अवचार यांचा सामाजिक बांधिलकीचा आदर्श; जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांच्याकडे धनादेश सुपूर्द

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी, ** जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी तसेच संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. याच सामाजिक बांधिलकीतून कारेगाव (ता. जि. परभणी) येथील सेवानिवृत्त कर्मचारी गोविंद बाबुराव अवचार यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ३१ हजार १ रुपयांची मदत दिली आहे. त्यांनी दुष्काळ निवारणाच्या कामांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या नावे असलेला ३१ हजार १ रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले उपस्थित होते.

सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक जाणिवेतून दुष्काळग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी श्री. अवचार यांनी दिलेले हे योगदान कौतुकास्पद असून, समाजातील इतर घटकांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे.



दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे. जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी, सहकारी संस्था, नागरिक आणि सामाजिक संस्थांनी दुष्काळ निवारणासाठी तसेच शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीत सढळ हाताने योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आण्णासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

उबाळे कुटुंबाला भास्कर आबा दानवेंची एक लाखांची मदत

शासन स्तरावर आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार; नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी प्रशासनाला सूचना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

जालना : जालना तालुक्यातील नंदापूर येथील किसन निळूबा उबाळे यांच्या घराला शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत मोठे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर भाजपाचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उबाळे कुटुंबीयांची भेट घेऊन नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी कुटुंबाला एक लाख रुपयांची आर्थिक मदत देतानाच शासन स्तरावरही मदत मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.

४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी तीनच्या सुमारास



विजेच्या तारांमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने उबाळे यांच्या घराला आग लागली होती. घराच्या पहिल्या मजल्यावर कापसाचा साठा होता. तसेच घराचे लाकडी माळवद आणि दुमजली बांधकाम असल्याने आगीने काही वेळातच भीषण रूप धारण केले. या आगीत संसारोपयोगी साहित्य, मुलांची शालेय पुस्तके, कापूस, धान्य आणि इतर मौल्यवान वस्तू जळून खाक झाल्या. घराचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने उबाळे कुटुंबावर बेघर होण्याची वेळ आली असून, सध्या त्यांना दुसऱ्याच्या घरी आश्रय घ्यावा लागत आहे.

या दुर्घटनेची माहिती घेतल्यानंतर भास्कर आबा दानवे यांनी उबाळे कुटुंबाला एक लाख रुपयांची रोख मदत दिली. तसेच कुटुंबातील मुलांना शालेय साहित्य देऊन त्यांना धीर दिला. संकटाच्या काळात केवळ सहानुभूती न दाखवता प्रत्यक्ष मदतीचा हात देणे ही सामाजिक बांधिलकी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान,

घटनास्थळावरूनच दानवे यांनी जालना तहसीलदार आणि महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. आगीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाच्या आर्थिक मदतीसाठी आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली.

यावेळी बोलताना भास्कर आबा दानवे म्हणाले, उबाळे कुटुंबावर आलेले संकट दुर्दैवी आहे. या कठीण प्रसंगी आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. कुटुंबाला शासनाकडून योग्य आर्थिक मदत मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन शासन स्तरावर सर्वतोपरी पाठपुरावा करणार आहे.

यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, सुनील पवार, सतीश केरकळ यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थकीत मालमत्ता करावरील शास्तीमाफी योजनेचा व्यापक प्रचार करा

अवैध प्लॉटिंग, अनधिकृत बांधकामे आणि धोकादायक होर्डिंगवर तातडीने कारवाईचे आयुक्त अमोल येडगे यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : थकीत मालमत्ता कराची एकरकमी रक्कम भरल्यास शास्तीवर १०० टक्के सूट देण्याच्या योजनेचा शहरात व्यापक प्रचार करून जास्तीत जास्त नागरिकांना या योजनेचा लाभ द्यावा आणि मालमत्ता कराची संपूर्ण वसुली करावी, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी दिले.

महानगरपालिका मुख्यालयात मंगळवारी दुपारी सर्व सहाय्यक आयुक्त, इमारत निरीक्षक, नगररचना आणि अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी आयुक्तांनी विविध विभागांच्या



कामकाजाचा आढावा घेतला.

शास्तीमाफी योजनेची माहिती प्रत्येक प्रभागातील नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांना थकीत कर भरण्यासाठी प्रोत्साहित करावे. मालमत्ता कराच्या नोंदी तपासताना दुबार नोंद झालेल्या मालमत्तांची पडताळणी करून नियमानुसार अशा नोंदी वगळाव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

शहरातील अवैध प्लॉटिंग आणि अनधिकृत बांधकामांवर लक्ष ठेवून अशी प्रकरणे आढळताच संबंधितांना नोटीस बजावून बांधकाम थांबविण्याची कारवाई करावी. नियमानुसार नियमित करता येणाऱ्या इमारतींची प्रक्रिया पूर्ण करावी, तर नियमित करणे शक्य नसलेल्या बांधकामांवर नियमानुसार कारवाई करावी, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. परवानगी घेतलेल्या प्लॉटिंग आणि बांधकामांची पडताळणी करण्यासाठी बीपीएमएस प्रणालीचा वापर करण्याबाबत पुढील आठवड्यात सहाय्यक आयुक्त व इमारत निरीक्षकांना प्रशिक्षण देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

दरम्यान, शहरातील अनधिकृत होर्डिंग आणि फलकांविरोधातील कारवाई तीव्र करण्यास सांगितले. वाहतुकीस अडथळा ठरणारे तसेच धोकादायक स्थितीत असलेले होर्डिंग तातडीने हटवावेत, असेही त्यांनी बजावले.

बैठकीला अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, अतिक्रमण विभागाचे सनियंत्रण अधिकारी संतोष वाहूळे, नगररचनाकार

जनजातीय गौरव दिन सेवा सप्ताहनिमित्त मांडव्यात दीपोत्सव

पालकमंत्री मेघना बोर्डीकर आदिवासी बांधवांच्या आनंदात सहभागी

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी, तालुक्यातील मांडवा येथे क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची जयंती आणि जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह निमित्य शनिवारी (दि.१४) आयोजित दीपोत्सवात पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर सहभागी झाल्या. आदिवासी बांधवांसोबत दीपोत्सव साजरा करत त्यांनी त्यांच्या आनंदात सहभाग नोंदविला. यावेळी आदिवासी समाजाच्या संस्कृती, परंपरा आणि अस्मितेचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाप्रसंगी पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी तरुण



डॉक्टर आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या शिक्षणाविषयी, अनुभवांविषयी तसेच भविष्यातील वाटचालीविषयी माहिती जाणून घेतली. याशिवाय गावातील महिलांशी विविध विषयांवर चर्चा करून त्यांच्या समस्या आणि अपेक्षा समजून घेतल्या. शिक्षण, आरोग्य आणि स्थानिक विकासाच्या विषयांवर नागरिकांशी थेट संवाद साधण्यावर त्यांनी भर दिला.

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि स्वाभिमानासाठी दिलेला लढा आजही प्रेरणादायी आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911